# गजानन महाराज आरती

जय जय सत्चितस्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड़ मूढ ताराया ।
जयदेव जयदेव ॥धृ॥

निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी ।
स्थिरचर व्यापुन उरले जे या जगतासी ।
तें तू तत्त्व खरोखर निःसंशय अससी ।
लीलामात्रे धरिले मानवदेहासी ॥१॥

होऊ न देशी त्याची जाणिव तू कवणा ।
करूनि 'गणि गण गणात बोते' या भजना ।
धाता हरिहर गुरूवर तूची सुखसदना ।
जिकडे पाहावे तिकडे तू दिससी नयना ॥२॥

लीला अनंत केल्या बंकटसदनास ।
पेटविले त्या अग्नीवाचुनि चिलमेस ।
क्षणात आणिले जीवन निर्जल वापीस ।
केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश ॥३॥

व्याधी वारून केले कैकां संपन्न ।
करविले भक्तालागी विट्ठलदर्शन ।
भवसिंधु हा तरण्या नौका तव चरण ।
स्वामी दासगणूचे मान्य करा कवन ॥४॥

|| अनंत कोटी ब्रम्हाण्ड नायक महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह सच्चिंतानंद

भक्त प्रतिपालक शेगाँव निवासी समर्थ सदगुरु श्री संत गजानन महाराज की जय ||